# मेट्रो-३ च्या कामासाठी निविदाकारांचा उत्तम प्रतिसाद



**मुंबई : प्रतिनिधी**

कुलाबा- वांद्रे- सीप्झ या मेट्रो-३ मार्गिकेच्या वायुवीजन आणि स्थानकांच्या वातानुकुलन कामासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनमध्ये (एमएमआरसी) पार पडलेल्या बैठकीमध्ये निविदाकारांनी उत्तम प्रतिसाद दिला.

मेट्रो-३ च्या भुयारी मार्गासाठी वायुविजन आणि स्थानकांच्या वातानुकुलनास पर्यावरण नियंत्रण प्रणालीच्या कामाकरिता नामांकित कंपन्यांकडून एमएमआरसीने आयोजित केलेल्या निविदापूर्व बैठकीला उत्तम प्रतिसाद मिळाला. वायुवीजन आणि स्थानकांच्या वातानुकुलानासह पर्यावरण नियंत्रण प्रणालीचे संपूर्ण काम तीन पॅकेजमध्ये विभाजित करण्यात आला आहे. गुरुवारी झालेल्या पूर्वअर्हता बैठकीला नामांकीत कंपन्यांनी हजेरी लावली होती. यामध्ये मे. ईटीए इंजिनीयरींग प्रायव्हेट लिमिटेड, मे. ब्लू स्टार लिमिटेड, मे व्होल्टाज, मे. टाटा प्रोजेक्टस लिमिटेड व मे. स्टर्लिंग अँड विल्सन प्रायव्हेट लिमिटेड यांचा समावेश होता.

पूर्व अर्हता निविदा एमएमआरसीच्या अधिकृत संकेतस्थळावर अडीज हजार रुपये ना परतावा निविदा शुल्क जमा केल्यावर दिनांक २६ मे २०१६ पर्यंत उपलब्ध होऊ शकेल. पूर्वअर्हता निविदा २७ मे २०१६ पर्यंत सादर करता येणार आहे. गुरुवारी झालेल्या बैठकीमध्ये एमएमआरसी आणि कंपन्यांचे प्रतिनिधी यांच्यामध्ये सकारात्मक बैठक झाली. मेट्रो-३ साठी तांत्रिकदृष्ट्या अद्यावत व सक्षम वायुविजन आणि वातानुकुलन यंत्रणेचा वापर करण्याचा आमचा उद्देश आहे, असे एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालिका आश्विनी भिडे म्हणाल्या. मेट्रो-३ साठी आरेमध्ये कारशेडला पर्यावरणवादी संघटनांनी संघटनांनी आक्षेप घेतल्याने हा प्रकल्प वादात सापडला होता.